# <u>राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक</u>

(पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले द्वितीय अपील**

**क्र.रामाआ/नाशिक/द्वितीय अपील क्रमांक - २०७०/२०१८/नाशिक**

१ श्री.राजेंद्र रामचंद्र गुजराथी, : अपिलार्थी
रा.रामटेक, देवळीचापाडा, पो.पिंपळपाडा,
ता.दिंडोरी, जि.नाशिक.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा, : प्रतिवादी
उप अभियंता,
नगर नियोजन विभाग, नाशिक महानगरपालिका,
नाशिक, ता.जि.नाशिक.

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा, : प्रतिवादी
कार्यकारी अभियंता,
नगर नियोजन विभाग, नाशिक महानगरपालिका,
नाशिक, ता.जि.नाशिक.

**सुनावणी दिनांक - १८/११/२०१९**

अपिलार्थी यांनी दिनांक १४/०८/२०१८ रोजीच्या अर्जान्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे. त्यामध्ये दिनांक १८/११/२०१९ रोजी आयोजित केलेल्या सुनावणीदरम्यान अपिलार्थी अनुपस्थित होते. विद्यमान जन माहिती अधिकारी उपस्थित होते. तत्कालीन व विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित होते.

अपिलार्थी यांनी द्वितीय अपील अर्जात नमूद केले आहे की, त्यांच्या दिनांक १४/०५/२०१८ रोजीच्या माहिती अर्जास अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी मागणी केलेली माहिती गोपनीय स्वरुपाची असल्याने पुरविली नाही. त्यामुळे मला प्रस्तुत द्वितीय अपील दाखल करावे लागले.

सुनावणीदरम्यान विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, अपिलार्थी यांचा दिनांक १४/०५/२०१८ रोजीचा माहिती अर्ज होता. याद्वारे त्यांनी स्पिंग व्हॅली को.ऑप.हौसिंग सोसायटी, बोधले नगर, नाशिक-पुणा रोड येथील काही सभासदांनी आमचे सदनिका विरुध्द दिनांक २५/०४/२०१८ रोजी दोन अर्ज केलेले असून १) सदनिकेच्या मागे व पुढे असलेल्या मोकळया जागेत केलेल्या लोखंडी ग्रिल व लोखंडी जाळी काढणे बाबत. २) आमच्या सदनिकेमध्ये असलेल्या नाशिक महानगरपालिकेच्या परवानगीने पाळलेल्या श्वानाबाबत केलेल्या तक्रारी अर्जाच्या झेरॉक्स प्रतीची माहिती मागितली होती. त्यास अनुसरुन अपिलार्थीस दिनांक

३१/०५/२०१८ रोजीच्या पत्रान्वये अतिक्रमण बाबत प्राप्त तक्रारीबाबतचे तक्रारदाराचे नाव ही गोपनीय माहिती असल्याने आपणास देता येणार नाही, असे कळविले. तद्नंतर अपिलार्थी यांनी दिनांक ११/०६/२०१८ अन्वये प्रथम अपील दाखल केले.

सुनावणीदरम्यान तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सांगितले की, अपिलार्थी यांच्या दिनांक ११/०६/२०१८ अन्वये दाखल केलेल्या प्रथम अपिलावर दिनांक ०५/०७/२०१८ रोजी निर्णय पारीत करुन जन माहिती अधिकारी यांनी केलेली कार्यवाही योग्य ठरवून प्रथम अपील निकाली काढले.

सुनावणीदरम्यानचा युक्तिवाद व आयोगास सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता असे दिसून आले की, अपिलार्थी यांच्या दिनांक १४/०५/२०१८ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अतिक्रमणाबाबत तक्रार करणाऱ्याचे नाव गोपनीय ठेवणे आवश्यक असल्यामुळे माहिती देता येत नसल्याबाबत कळविल्याचे स्पष्ट होते. म्हणून तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ७ (१) अन्वये केलेली कार्यवाही योग्य असून अपीलात काही तथ्य नाही.

सबब, प्रस्तुत प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**<u>आदेश</u>**

प्रस्तुत द्वितीय अपील क्रमांक २०७०/२०१८/नाशिक निकाली काढण्यात येत आहे.

(के.एल.बिश्नोई)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक